# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 12/09/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि.मी अंतरावर मौजा पाचगाव शिवार येथे दिनांक 11/09/2020 चे 12:40 वा. ते 01.20 वा. सुमारास पुनम पेट्रोलपंप वरील कामगार झोपलेल्या स्थितीत पाहुन तीन अज्ञात आरोपीतांनी संगनमत करून मशीन जवळ पांढऱ्या रंगाची अज्ञात स्कॉर्पीओ गाडी उभी करून दोन नौजलने 695.57 ली. डिजेल प्रत्येकी किंमत 7,848/–रू. असा एकुण कि. 54,588/–रू. चा माल ड्रममध्ये भरून गाडीतुन तीन अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शहिद अजीज शेख, वय 31 वर्ष, रा. मोठा ताजबाग, याशीन प्लॉट उमरेड रोड नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. दिलीप लांजेवार मो. क्र. 9168522014 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. भिवापुर :– दि. 10/09/2020 चे 11:30 वा. ते 00.20 वा. चे सुमारास 23 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि आपल्या परीवारासह घरी जेवन करीत असतांना आरोपी नामे– अमित देवराव गावंडे, वय 35 वर्ष, रा. झिलेबोडी हा दारू पिऊन तेथे आला व पीडितेला शिवीगाळ करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर पीडितेचे पतीने आरोपीला हटकले असता त्याने शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भगवानदास यादव हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर – दिनांक 05/09/2020 चे 13.00 वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांच्या 17 वर्षीय मुलीला आरोपी नामे– वैभव विनायक सुर्यवंशी, रा. सोनोली ता. कळमेश्वर याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून तिला पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री सतीश पाटील 8805256982 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर